# प्रेस नोट

जा.क्र. जिपला/ पसं/कार्या- 4 /कावी- 739 /2017
पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद लातूर.
दिनांक- 13 /09/2017

**प्रति**

**मा.जिल्हा माहीती अधिकारी**
**लातुर**

**विषय:-** पशुसंवर्धन खात्याच्या योजनांना व्यापक प्रसिदधी देणेबाबत.

वरील विषयास अनुसरून विनंती की, "सन-2017-18 या आर्थीक वर्षासाठी जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत एकात्मिक कुक्कुट विकास योजना जिल्हयामध्ये राबविण्यात येणार आहे सदरील योजनेत निवड झालेल्या लाभार्थ्यांना 100 देशी एकदिवसीय कुक्कुट पिल्ले व त्यासाठी लागणारे खादय यासाठी अनुदान दिले जाणार आहे. सदरील योजना प्रति लाभार्थी रू.16000/- ची असुन 50 टक्के शासकिय अनुदान व 50 टक्के लाभार्थी हिस्सा असे योजनेचे स्वरूप आहे.

ही योजना सर्वसाधारण असुन सर्वांसाठी खुली आहे छोटया प्रमाणात कुक्कुट पालन करून त्यापासुन उत्पन्नाचे साधन निर्माण करणे हा योजनेचा उददेश आहे. जिल्हयातील 10 ही तालुक्यातुन या योजनेसाठी अर्जदाराकडुन अर्ज मागवण्यात येत आहेत.अर्जाचा नमुना व आवश्यक कागदपत्रे संबधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी(वि) पं.स/ किंवा नजीकच्या पशुवैदयकिय दवाखान्याकडुन उपलब्ध करून घ्यावेत.

पुर्णपणे भरलेले विहित नमुण्यातील अर्ज दि.15 सप्टेंबर 2017 ते 14 ऑक्टोंबर 2017 या कालावधीत संबधित पशुधन विकास अधिकारी(वि) पं.स/ नजीकच्या पशुवैदयकिय दवाखान्यात जमा करावेत. लाभार्थीची निवड पात्र अर्जामधुन सोडत पदधतीने करण्यात येणार आहे.त्यामुळे 14 ऑक्टोंबर 2017 नंतर प्राप्त् होणा-या किंवा अपुर्ण अर्जाचा निवडीच्या सोडतीसाठी विचार केला जाणार नाही. तरी जास्तीत जास्त संख्येने लातुर जिल्हयातील इच्छुक व्यक्तींनी अर्ज करावेत असे आवाहन डॉ.बी.यु.बोधनकर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परीषद लातुर यांनी केले आहे."

वरील बातमीस व्यापक प्रसिदधी देण्यात यावी हि विनंती.

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी**
**जिल्हा परीषद लातुर**

**प्रत माहीतीस्तव सविनय सादर**

1. **मा. अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.लातुर.**
2. **मा.जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त् लातुर.**

स्वा

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी**
**जिल्हा परीषद लातुर**